# प्रकरण ६ वे

# " संशोधनाचा सारांश निष्कर्ष व शिपारशी "

प्रकरण ६ वे.

# संशोधनाचा सारांश, निष्कर्ष व शिपारशी

६:१ प्रास्ताविक.

६:२ संशोधन सारांश.

६:२:१ संशोधनाची उद्दिष्टे.

६:२:२ संशोधन सामग्रीचे स्वरूप.

६:२:३ संशोधन साधने व संशोधनाची कार्यवाही.

६:३ अध्यापकांची शैक्षणिक अर्हता व अनुभव.

६:४ पाठ्यक्रम व प्रतिबिंबित होणारी गाभामूल्ये.

६:५ पुढील संशोधनासाठी विषय निर्देशन.

६:१ प्रास्ताविक :

गेल्या प्रकरणात-प्रकरण क्रमांक ५ 'संशोधन सामग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वाचन' प्रस्तुत संशोधनासाठी उपलब्ध झालेल्या माहितीचे विष्लेषण व अर्थनिर्वचन केलेले आहे.

या प्रकरणात समग्र संशोधनाचा सारांश सादर करण्यात येईल. तसेच गेल्या प्रकरणात या संशोधनाच्या संदर्भात उपलब्ध झालेल्या सामग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केलेले आहे. त्यावर आधारित निर्ष्कष काढण्यात येतील आणि या निष्कर्षाच्या अनुषंगाने शिफारशी करण्यात येतील. तसेच हे संशोधन करताना संशोधिकेला काही समस्या आल्या या समस्या संशोधनविषयाशी प्रत्यक्ष संबधित नसल्यामुळे याविषयी खोलात जाउन ऊहापोह केलेला नाही तथापि या समस्यांचा पुढील संशोधनासाठी निर्देश केलेला आहे.

६:२ संशोधन साराशं :

प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय " प्राथमिक स्तरावरील प्रथम भाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकांचे १० गाभाभूत धटकांच्या दृष्टीने केलेले मूल्यमापन" हा असून या विषयाच्या संदर्भात पाठ्यपुस्तकांचे चिकित्सक वाचन व निरीक्षण करुन पाठ्यपुस्तकातील पाठामधून कोणती गाभामूल्ये प्रतिबिंबित होतात याचा शोध घेणे हा हेतू आहे.

### ६:२:१ संशोधनाची उद्दिष्टे :

१) इयत्ता १ली ते ४ थी या स्तरावरील मातृभाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकांतील पाठामधून व्यक्त होणाऱ्या गाभामूल्यांचा शोध घेणे.

२) ही गाभामूल्ये त्या पाठातून कशी प्रतित होतात ते तपासणे.

३) पाठ्यपुस्तकातून अविष्कृत झालेल्या प्रत्येक मूल्यांचे महत्वांश ठरविणे.

४) प्रत्येक मूल्यांच्या महत्वांशाविषयी कारणमिमांसा करणे.

### ६:२:२ संशोधन सामग्रीचे स्वरूप :

प्राथमिक स्तरावरील इयत्ता १ली ते ४ थी च्या पाठ्यपुस्तकात ही गाभामूल्ये आढळतात का? हे पहाणे आवश्यक आहे यासाठी मुख्य साधन म्हणून इयत्ता १ली ते ४ थी ची पाठ्यपुस्तके महत्वाची ठरतात. या साठी संशोधिकेने ही पाठ्यपुस्तके काळजीपूर्वक, चिकीस्तकपणे वाचली. पाठ्यपुस्तकातील गद्य व पद्य पाठामधून गाभामूल्ये प्रतिबिंबित होतात असे तिला वाटते. संशोधिकेने प्रत्येक इयत्तेसाठी एक अशी १ ली ते ४ थी साठी चार सारण्या तयार केल्या.

### ६:२:३ संशोधन साधने व संशोधनाची कार्यवाही.

प्रत्येक इयत्तेच्या पाठ्यपुस्तकातील पाठामधून प्रतिबिंबित झालेली १० गाभामूल्यासबंधित सारणी तयार केल्यानंतर संशोधिकेला अभिप्रेत असलेली मूल्ये प्रतिबिंबित होतात की नाही याची यथार्थता पडताळून पहाण्यासाठी संशोधिकेने इयत्ता १ ली ते ४ थी या इयत्ताना अध्यापन करणाऱ्या

शिक्षकांना या सारण्या दिल्या. सारण्याबरोबरच एक छोटीशी प्रश्नावली दिली आणि संशोधिकेने शोधून काढलेल्या १० गाभाभूत मूल्याव्यतरिक्त आणखी काही मूल्ये प्रतिबिंबित होत असल्यास त्या त्या पाठापुढे लिहिण्यास सांगितली आणि तसेच संशोधिकेने दिलेल्या १० गाभाभूत मूल्यापैकी एखादे मूल्य त्या पाठामधून प्रतिबिंबित होत नसल्यास त्याभोवती वर्तुळ काढल्यास सांगितली आणि अशाप्रकारे त्या अध्यापक प्रतिसादकांकडून इयत्या १ ली ते ४ थी या इयत्तांच्या प्रथम भाषा मराठी या विषयाच्या पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठामधून १० गाभाभूत मूल्यपैकी कोणती मूल्ये प्रतिबिंबित होतात याचा शोध घेतला.

## ६:३ अध्यापकाची शैक्षणिक अर्हता व अनुभव :

प्रकरण ५ मधील प्रश्नावली भरून देणाऱ्या अध्यापकांची सर्वसाधारण माहिती या मुद्दयाचा विचार केला असता प्रश्नावलीद्वारे आलेल्या सामग्रीचे विश्लेषण करून अन्वयार्थ लावल्यानंतर अध्यापकांच्या शैक्षणिक अर्हता व अध्यापनाच्या अनुभवासंबधी जे निष्कर्ष निघतात त्यांचे विवरण आणि त्यावर आधारित शिफारशी पुढील परिच्छेदातून केलेल्या आहेत.

प्रकरण ५ मधील सारणी क्रमांक ५.१ वरून प्रतिसाद दिलेल्या शिक्षकांची शैक्षणिक पात्रता लक्षात येते .ही शैक्षणिक पात्रता (S.S.C., D.Ed, ते M.A., B.Ed.) पर्यंत आहे.

याचाच अर्थ असा की बहूतांशी सर्व प्रकारची शैक्षणिक पात्रता

असलेल्या शिक्षकांनी प्रश्नावलीस प्रतिसाद दिलेला आहे. प्राथमिक शिक्षक होण्यासाठी (H.S.C., D.Ed,) ही किमान शैक्षणिक अर्हता आवश्यक आहे.

प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांच्या अध्यापनाचा एकूण अनुभव सारणी क्र. ५.२ दिलेला आहे या सारणी वरून असे लक्षात येते की शिक्षकांचा अध्यापण अनूभव ५ वर्षा पासून ३५ वर्षा पर्यंत इतका प्रदीर्घ आहे. या अध्यापकांचा सरासरी अनूभव '१६' वर्षे इतका प्रदीर्घ आहे या शिक्षकांचा मराठी अध्यापनाचा अनुभव-सारणी क्रमांक ५:३ मध्ये दिलेला आहे. या सारणीवरून असे लक्षात येते की शिक्षकांचा मराठी अध्यापन अनुभव ५ वर्षापासून ३५ वर्षापर्यंत इतका प्रदीर्घ आहे शिक्षकांचा सरासरी मराठी अध्यपनाचा अनूभव '१२' वर्षे इतका दीर्घ आहे.

सारणी क्रमांक ५ .२ व सारणी क्रं. ५ .३ या दोन सारणीच्या विश्लेषणातून असा निष्कर्ष निघतो की, कोणताही मानदंड लावला तरी प्रतिसाद दिलेल्या अध्यापकांनी प्राप्त केलेला अनुभव हा प्रदीर्घ स्वरूपाचा आहे.

## ६:३ पाठ्यक्रम व प्रतिबिंबित होणारी गाभामूल्ये :

प्रस्तुत विभागात १ ली ते ४ थी इयत्तेनुसार पाठ्यक्रम-पाठांची नावे व त्यातून प्रतिबिंबित होणारी गाभामूल्ये दिलेली आहेत. प्रतिसादक अध्यापकांच्या प्रश्नावलीद्वारे आलेल्या सामग्रीचे विश्लेषण करून अन्वयार्थ लावल्यानंतर जे निष्कर्ष निघतात त्यांचे विवरण केले आहे. व त्यावर आधारित शिफारशी केलेल्या आहेत.

सारणी क्रं. ५ .४ मध्ये इयत्ता १ ली च्या बालभारती पाठ्यपुस्तकातील पाठामघून प्रतिबिंबित होणारी गाभामूल्ये दिलेली आहेत. ही गाभामूल्ये पुरेशा प्रमाणात आहेत अशी नोंद प्रतिसादक अध्यापकांनी दिलेली आहे.

सारणी क्रं. ५ .५ मध्ये-इयत्ता २ री च्या बालभारती पाठ्यपुस्तकातील पाठामधून प्रतिबिंबित होणारी गाभामूल्ये दिलेली आहेत. ही मूल्ये पुरेशा प्रमाणात आहेत अशी नोंद प्रतिसादक अध्यापकांनी दिलेली आहे.

सारणी क्रं. ५ .६ मध्ये-इयत्ता ३ री च्या बालभारती पाठ्यपुस्तकातील पाठांची नावे व त्यातून प्रतिबिंबित होणारी गाभामूल्ये दिलेली आहेत. ही मूल्ये पुरेशा प्रमाणात आहेत. अशी नोंद प्रतिसादक अध्यापकांनी दिलेली आहे.

सारणी क्रं. ५ .७ मध्ये-इयत्ता ४ थी च्या बालभारती पाठ्यपुस्तकांतील पाठांची नावे व त्यातून प्रतिबिंबित होणारी गाभामूल्ये दिलेली आहेत. ही गाभा मूल्ये पूरेशा प्रमाणात आहेत अशी नोंद प्रतिसादक अध्यापकांनी दिलेली आहे.

इयत्ता १ ली ते ४ थी च्या पाठ्यपुस्तकांतील पाठामधून प्रतिबिंबित होणारी गाभामूल्य ही पूरेशा प्रमाणात आहेत असा होकारात्मक प्रतिसाद असला तरी मराठी अध्यापन करणाऱ्या सर्व अध्यापकांनी या गाभामूल्यांच्या नोंदीची दखल घेणे आवश्यक आहे. भाषिक कौशल्याच्या विकसनावर भर देत असताना या गाभामूल्यांचीही दखल घेणे आवशाक्य आहे. तरच अध्यापनामधून गाभामूल्याधिष्ठित अध्ययन अनुभुती दिल्या जातील

गाभामूल्यांचे संक्रमण होते किंवा नाही यांचे ही मूल्यापन होणे आवशक्य आहे. यावरून अशी शिफारस करावेशी वाटते की गाभामूल्य-स्वरूप-व्याप्ती या संदर्भात अध्यापकांना योग्य ते मार्गदर्शन देण्यात यावे.

## ६:४ सर्वसाधारण निष्कर्ष आीण शिफारशी :

राष्ट्रीय गाभामूल्य संक्रमन ही आदर्श नागारिकांच्या जडण-घडणसंबंधीची महत्वाची बाब असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी संबधित असलेल्या धटकांमध्ये (पालक, मुख्याधापक, शिक्षक, शासन, समाजातील मान्यवर) गाभामूल्य परिचय, शोधन व जाणीव या वृत्ती असणे आवश्यक आहे.

त्यासाठी विध्यार्थ्याच्या शिक्षणाशी संबधित मानवी घटकांमध्ये (शिक्षक,पालक व समाज इ.) अभ्यासक्रमांतर्गत विषयातील पाठ्यक्रमांतर्गत पाठामधून प्रतिबिंबित होणारी गाभामूल्य शोधन प्रवृत्ती विकसित झाली पाहिजे. यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत.

असे झाले तरच देशाच्या भावी आदर्श नागरिकांची जडण-घडण शाळा- शाळामधून होउ शकेल सर्वंकष विकासाच्या दृष्टिकोनातून मूल्यांच्या अपेक्षित वर्तन बदलांचा विचार पुऱ्या अर्थाने होउ शकेल.

## ६:५ पुढील संशोधनासाठी विषय निर्देशन :

प्रस्तुत प्रकरणाच्या आतापर्यंतच्या भागात या संशोधनाचे निर्ष्कष व शिफारशी सादर केल्या प्रस्तुत संशोधन हे १ली ते ४ थी इयत्तांच्या प्रथम भाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणाऱ्या १० गाभाभूत घटकांच्या संदर्भात आहे तथापि या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित झालेले हे १० गाभाभूत घटक विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होणाच्या दृष्टीने अध्यापक वर्ग प्रत्यक्ष अध्यापन करत असताना ते कशा रितीने संक्रमित करतात यासंबधीचे संशोधन होणे आगत्याचे आहे. प्रस्तुत संशोधिकेने हा विषय प्रत्यक्षपणे तिच्या संशोधन विषयाशी प्रत्यक्ष संबधित नसल्यामुळे या संबधिचे संशोधनपूर्ण विवरण, विवेचन केलेले नाही. परंतु सदर विषयाच्या सम्यक आणि परिपूर्ण आकलनासाठी या विषयाचे , समस्यांचे संशोधन होणे आगत्याचे आहे असे वाटते. या समस्यांचा खालील परिच्छेदातून पुढील संशोधनासाठी निर्देश केलेला आहे.

१) प्रस्तुत संशोधन हे प्रथम भाषा मराठीच्या इयत्ता १ ली ते ४ थी च्या पाठ्यपुस्तकांतून प्रतिबिंबित होणाऱ्या गाभामूल्यांच्या संदर्भात आहे. परंतु विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण दृष्टिकोनातून विकास होणाच्या दृष्टीने गाभामूल्याधिष्टित अध्यापनाच्या संदर्भात व अध्यापनामधून ही गाभामूल्ये मुलांमध्ये कशी संक्रमित करता येतील त्यासाठी शाळांतर्गत व शाळाबाह्य कोणकोणत्या कार्यकमाचे आयोजन करणे गरजेचे आहे याचे संशोधन गाभामूल्यांच्या संदर्भात अधिक उपकारक ठरेल अशी आशा आहे.

२) शिक्षणव्यवसाय निवडणारा अध्यापक केवळ शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेला असून चालणार नाही. त्याचबरोबर त्याच्या ठिकाणी राष्ट्रीय गाभामूल्यांचा दृष्टिकोन असणे आवश्यक आहे. अध्यापक निवडीच्यावेळी त्याचा राष्ट्रीय गाभामूल्य विषयक दृष्टीकोन, त्याची गाभामूल्याविषयाची निष्ठा आणि मूल्ये संक्रमित करण्याची त्याची क्षमता याची चाचणी होणे आवश्यक आहे. संशोधनाद्वार अशा चाचण्या तयार केल्यास त्या उपयुक्त ठरतील.

३) गाभामूल्य संक्रमण ही केवळ शाळेची जबाबदारी नाही. सर्व मानवी घटकांचे सहकार्य त्यासाठी अत्यंत गरजेचे असते त्यासाठी विद्यार्थ्याशी संबधित घटक (पालक , शिक्षणसंस्था, शिक्षक, मुख्याध्यापक, शासन) यांच्यामध्ये सहकार्य आणि सामंजस्य कसे राहील, त्यामधील अडचणी दूर कशा करता येतील, यासंबधी संशोधन होणे अत्यंत गरजचे आहे.

४) प्रत्येक गाभाभूत मूल्यात कोणती उपमूल्ये समाविष्ट होऊ शकतील ही उपमूल्ये या स्तरावरील पाठ्यपुस्तकांच्या पाठामधून प्रतिबिंबित झाली आहेत की नाहीत याचा खोलवर अभ्यास करण्यात आलेला नाही.

५) अध्ययन -अध्यापन प्रक्रियेनंतर राष्ट्रीय गाभाभूतमूल्ये विद्यार्थ्यामध्ये किती प्रमाणात संक्रमित होतात याचे मूल्यमापन होणे आगत्याचे आहे यसंबधी संशोधन होणे आवश्यक आहे.

संदर्भ :

१) राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद "Exemplar Materials on some core curricular Arieas " (नवी दिल्ली) १९८७.

२) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे. - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -१९८६, गाभा घटक परिचय

३) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे - ३० प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम -१९८८ (इयत्ता १ ते ५)

४) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च्यमाध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे. - मूल्यशिक्षण शिक्षक हस्तपुस्तिका.

५) छापेकर, ल. नी. :- असे होतात संस्कार (नागपूर - मंगल प्रकाशन) १९८१.

६) सहस्त्रबुध्दे दि. ह. :- शिक्षणातून नैतिक मूल्यसंवर्धन (पुणे- साधनात्र प्रकाशन ) १९८४.

७) नाडकर्णी म. द. :-शिक्षणाच्या वास्तव दिशा (मुंबई - ललित नाट्य प्रकाशन) १९८७.

८) भगत रा. तु. :- आजच्या शिक्षणातील विचार प्रवाह (कोल्हापूर - चैतन्य प्रकाशन) १९८२.

९) देवस्थळी रा. भा. :- विद्यार्थी मित्रांनो (कोल्हापूर - सन्मित्र प्रकाशन) १९८९.

१०) पाटील लीला :- <u>मूल्यशिक्षण</u> (कोल्हापूर- प्राचार्य श्री. महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालय, सुवर्ण महोत्सवी विशेषांक.) १९८४.

११) Goyal B. R. :- Documents on Social Moral and Spiritual Values in Education. New Delhi : N.C.E.R.T.) 1979.

12) Heg, Ehsqnul :-Educational and Political Modernization. An analysis of school text book in Delhi, NIE, Journal, May 1973, 7(5) 19-25.

13) Gore, M. S. :-Field Studies in th Sociology of Education:(New Delhi : N. C. E. R. T.)f1970.

14) Keasey C. M. :- Experimentally induced change in moral opinions and reasoning. Journal of personality and social psychology, 20 30-33 , 1973.

15) Choudhari, U. S. and Sharma B. N. : - Comparative study of values Reflected in National and state level Hindi Text Books, M.Ed. Dissertation, Indore: University of Indore, 1974.

16) Choudhari, U. S. :- An Evaluation of Nationalized Hindi Text Books of Madya Pradesh, Ph.D. Thesis,

Indore : University of Indore, 1975.

17) Yeager Barbara, Devonnaa, Virginia Institute and State University :- Moral Development and Childrens Literature. Abstract International Vol. 44 1984.

18) Rise, Steven, I :-Harvard University " An Empirical Study of an Educational Intervention Curriculum and facilitative effect upon moral development, Abstract International, Vol. 44 1989.

19) Garrod, Andrew Carruthers, Ed. D. Harward University : A Developmental approach to the teaching of Literature, A Context for moral and ego growth in adolescents. Dessertation Abstract International Vol. 45, 1984.

20) Bailey, Deborah Ann, Ph.D. University of Missouri Columbia.

The Relationship between stages of moral Judgement and elementary class room teachers

perceptions of distrurbing behaviour. Dessertation Abstract International, Vol 46, 1986.

21) Savant, M. N. :- Bharatiy Shikshan, (Bombay : Editor - Bharatiy Shikshan) (Monthly) Vol. No. 5, July 89 , p. 269.

२२) सांगळे के. एन. :- प्राथमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाचा मूल्यशिक्षणाच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास. (कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ एम. फिल. प्रबंध. १९९०.)

२३) वेदांते एम. बी. :- माध्यमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकाच्या अध्यपनाचा मूल्य शिक्षणाच्या संदर्भात चिकित्सात्मक अभ्यास. एम्. फिल. प्रबंध (१९८९)

२४) करंदीकर सुदेश :- इयत्ता ५ वी ते १० वीच्या मराठीच्या प्रचलित पाठ्यपुस्तकात मातृभाषेच्या अध्यापनाची मूल्यात्मक उद्दिष्टे किती प्रमाणात प्रतिबिंबित झाली आहेत व व्हावीत यांचा चिकित्सक अभ्यास. पुणे विद्यापीठास सादर केलेला पी. एच.डी. चा प्रबंध (१९९०)

२५) ससे वर्षा :- उच्च माध्यमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यपनाचा मूल्यशिक्षणाच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास. कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ, एम्.फिल. प्रबंध (१९८८)